# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः22.07.2024** **वारःसोमवार**

---

**ठळक बातम्या**

- विश्व वारसा केंद्रासाठी भारताचं एक दशलक्ष डॉलर्सचं योगदान, वारसा संवर्धनासाठी भारत वचनबद्ध- पंतप्रधानांचं प्रतिपादन
- संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून, सर्वपक्षीय बैठकीत विरोधी पक्षांकडून सरकारला सूचना
- आगामी काही दशकं देशात भाजपाचंच सरकार, केंद्रीय मंत्री अमित शहा यांचं भाजपा महाअधिवेशनात स्पष्टोक्ती
- 65 व्या आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड स्पर्धेत 4 सुवर्णपदकं पटकावत भारतीय संघाची ऐतिहासिक कामगिरी

आणि

- महाराष्ट्रात मुंबई, कोकणसह अनेक जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा

**विश्व वारसा**

वारसा संवर्धनाच्या प्रयत्नात जागतिक सहकार्य तसंच स्थानिक समुदायांना सामील करुन घेण्यासाठी भारत नेहमीच वचनबद्ध राहील. भारताचा वारसा म्हणजे केवळ इतिहास नसून ते विज्ञान असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्लीत केलं. दिल्लीतल्या भारत मंडपम् इथं विश्व वारसा समितीच्या 46 व्या सत्राचं उद्घाटन काल पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात आलं. भारत पहिल्यांदाच हे सत्र आयोजित करत असून, ते 31 जुलैपर्यंत सुरू राहाणार आहे.उद्घाटनप्रसंगी बोलताना पंतप्रधान म्हणाले की, गेल्या काही वर्षात सरकारनं भारतातल्या साडेतीनशेहून अधिक प्राचीन वारसा स्थळांना पुनरुज्जीवित केलं असल्याचं सांगून, मोदी म्हणाले की, प्राचीन वारश्याचं पुनरुज्जीवन, हे इतिहासाप्रती आदर तसंच जागतिक दातृत्व यांचं प्रतिबिंब आहे. जगातली सर्वात जुनी संस्कृती असलेल्या आमच्या भारत देशात हे सत्र आयोजित केलं जात असल्याचंही त्यांनी नमूद केलं.याचवेळी युनेस्को च्या विश्व वारसा केंद्राच्या, क्षमतावृद्धी, तांत्रिक सहाय्य आणि जागतिक वारसा स्थळांच्या जतन यासाठी एक दशलक्ष अमेरिकन डॉलर्सचे योगदान मोदी यांनी जाहीर केले. हा निधी मुख्यत्वे

जगातल्या विकसनशील देशांसाठी वापरला जाणार आहे.जागतिक वारसा समिती ही, जागतिक वारसा विषयक सर्व बाबींच्या व्यवस्थापनासाठी तसंच संकेतस्थळावर नोंदवल्या जाणाऱ्या जागतिक वारसा यादीविषयी निर्णय घेण्यासाठी जबाबदार असते. वर्षातून एकदा या समितीचे बैठकसत्र आयोजित केलं जातं. दिल्लीत सुरू असलेल्या बैठकीत, जागतिक वारसा यादीत नवीन स्थळांच्या नोंदींचा प्रस्ताव, विद्यमान 124 जागतिक वारसा स्थळांच्या संवर्धनाच्या स्थितीचा अहवाल, तसंच आंतरराष्ट्रीय सहाय्य आणि जागतिक वारसा निधीचा वापर याविषयी चर्चा होणार आहे. दीडशे देशांतले दोन हजारहून अधिक आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय प्रतिनिधी या बैठकीत सहभागी होत आहेत.

**अर्थसंकल्प**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून दिल्लीत सुरू होत आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आज आर्थिक सर्वेक्षण संसदेच्या पटलावर मांडतील तर उद्या, 23 एप्रिलला केंद्रीय अर्थसंकल्प सादर करतील. अधिवेशन काळात दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत पार पडावं यासाठी काल अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला सरकारनं सर्वपक्षीय बैठकीचं आयोजन केलं होतं. बैठकीनंतर वार्ताहरांशी संवाद साधताना संसदीय कार्यमंत्री किरेन रिजीजू यांनी, सरकार कोणत्याही मुद्द्यावर खुलेपणाने चर्चा करण्यात तयार असल्याचं सांगितलं. संसदेचं कामकाज सुरळीत चालवणे ही सरकारबरोबर विरोधकांचीही जबाबदारी असते, हे त्यांनी आवर्जून नमूद केलं. संसदेतल्या विविध पक्षनेत्यांच्या बहुमोल सुचनांसाठी त्यांनी आभार मानले, तसेच अधिवेशन सुरळीत पार पडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचं आवाहन रिजीजू यांनी केलं.सर्वपक्षीय बैठकीत, काँग्रेसनं नीट प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरण, रेल्वे सुरक्षा, अग्निवीर योजना, केंद्र-राज्य सरकार नातेसंबंध आणि मणिपूर, जम्मू आणि काश्मीर इथल्या सुरक्षा परिस्थिती आदी मुद्द्यांवर अधिवेशनात चर्चा व्हावी अशी मागणी केली. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जयराम रमेश यांनी समाजमाध्यमांवरील संदेशात, देशातल्या अर्थव्यवस्थेशी निगडीत मुद्यांवरही चर्चा व्हावी अशीही मागणी काँग्रेसनं केली असल्याचं म्हटलं आहे.

**नीट निकाल**

नीट पदवीपूर्व प्रवेश परीक्षा 2024 साठी 23 लाखांहून अधिक विद्यार्थी बसले त्यापैकी 2321 विद्यार्थ्यांनी सातशे किंवा त्याहून अधिक गुण मिळवले होते. सरकारी सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, देश आणि परदेशातून 1404 केंद्रांवर या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. देशातल्या 25 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात 276 शहरांमध्ये ही परीक्षा केंद्र होती.  नीट पदवीपूर्व प्रवेश 2024 परीक्षेत एक ते शंभर पर्यंत क्रमांक मिळवणारे विद्यार्थी 56 शहरांतल्या 95 केंद्रांमधले आहेत.

**शिक्षण सप्ताह**

शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाच्या वतीनं आजपासून शिक्षा सप्ताह पाळला जाणार आहे, तो 28 जुलैपर्यंत चालेल. विद्यार्थी, शिक्षक आणि लाभधारकांमध्ये राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 अंतर्गत सादर केलेल्या प्रभावी शैक्षणिक सुधारणा आणि सहयोग यांना प्रोत्साहन देणे हे या सप्ताहाचे उद्दीष्ट असेल. या कालावधीत, अध्यापन-शिक्षणसाहित्य दिवस, पायाभूत साक्षरता,संख्याशास्त्र, क्रीडा दिवस आणि सांस्कृतिक दिवस या विषयानुरूप दिवस साजरे केले जातील.

**अमित शहा**

भारतीय जनता पार्टी हा विचारधारेला अनुसरून काम करणारा पक्ष आहे; महान भारताची उभारणी भाजपाकडूनच होईल आणि आगामी काही दशकं देशात भाजपाचंच सरकार असेल, असं ठाम प्रतिपादन ज्येष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी काल  पुण्यात केलं. आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं काल  भाजपाचं महाअधिवेशन झालं; या अधिवेशनाच्या समारोपाच्या सत्रात शहा यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलं. लोकसभा निवडणुकांच्या काळात विरोधकांनी खोटा प्रचार केला; तो खोडून काढा, आत्मविश्वास जागृत करा, भाजपाच्या ज्येष्ठ, जुन्या-जाणत्या नेत्यांचे विचार समोर ठेवा, आपापसातील मतभेद दूर करा आणि एकजूट होऊन विधानसभेच्या निवडणुकीमध्ये काम करा असा आदेश त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना दिला.यावेळी त्यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली. तत्पूर्वी या अधिवेशनात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध नेत्यांनी आपले विचार मांडले. मराठ्यांना ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्याबाबत शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांनी आपली मतं स्पष्ट करावीत अस फडणवीस यावेळी   म्हणाले. विविध नेत्यांसह भाजपाचे 5 हजारापेक्षा जास्त कार्यकर्ते आणि पदाधिकारी या अधिवेशनात सहभागी झाले होते.

**गणित ऑलिम्पियाड**

65 व्या आंतरराष्ट्रीय गणितीय ऑलिम्पियाड स्पर्धेत भारताच्या संघानं 4 सुवर्णपदकं पटकावत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली. महाराष्ट्रातल्या मुंबईचा रुशील माथूर, पुण्याचा आदित्य मांगुडी वेंकट गणेश, आसामच्या गुवाहाटीतल्या आनंदा भादुरी आणि उत्तर प्रदेशच्या नोएडातला कणव तलवार यांनी या स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवलं. दिल्लीच्या अर्जुन गुप्ताला रौप्य पदक तर पुण्याचा सिद्धार्थ चोपरा याला आदरणीय पदक मिळालं आहे.1989 मध्ये या स्पर्धेत पदार्पण केल्यानंतर भारताची ही आजवरची सर्वोत्कृष्ट कामगिरी असून यंदा भारतानं चौथ्या स्थानावर झेप घेतली. या स्पर्धेत 108 देशातल्या 609 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**कावड यात्रा**

श्रावण महिन्यातल्या प्रतिवार्षिक कावड यात्रेला आजपासून सुरुवात होत आहे. या यात्रेदरम्यान गंगा नदीच्या काठावरील हरिद्वार, गौमुख आणि गंगोत्री या तीर्थक्षेत्रांना भाविक भेट देतात आणि त्यांच्या कावडमध्ये गंगेचं पवित्र जल भरुन घेतात. आणि श्रावण शिवरात्रीला विविध शिवमंदिरात हे जल अर्पण करुन यात्रेची सांगता करतात.ही यात्रा सुरळीत पार पडावी यासाठी उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड राज्य सरकारांनी चोख व्यवस्था तैनात केली आहे. तसंच देशाच्या विविध भागातून दिल्लीत येऊन कावड यात्री पुढचा प्रवास दिल्ली हरियाणामार्गे करत असल्यामुळे दिल्ली पोलिसांनी वाहतूकीत काही बदल केले आहेत.

**निपा-केरळ**

निपा विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आरोग्यविषयक उपाययोजनांची तातडीनं अंमलबजावणी करण्याच्या सूचना केंद्र सरकारनं केरळच्या राज्य सरकारला दिल्या आहेत. मनप्पुरम जिल्ह्यातल्या एका 14 वर्षांच्या मुलाचा निपा विषाणू संसर्गामुळे काल मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर केरळमध्ये आरोग्य मंत्रालयाच्या राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत साथरोग प्रतिबंधक कृती दल तैनात करण्यात येणार आहे. हे पथक राज्य सरकारला निपा विषाणू संसर्गाची कारणं, फैलाव याबाबतच्या तपासात तांत्रिक मदतीसह अन्य बाबतीतही सहकार्य करेल.

**अतिवृष्टी-मुख्यमंत्री**

महाराष्ट्राच्या विविध भागात मुसळधार पाऊस पडतो आहे. कोकणात मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झालं आहे. मुंबईसह कोकणातल्या काही जिल्ह्यांमध्ये आणि राज्यातल्या अन्य भागात मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्यानं दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य आपत्ती प्रतिसाद दल, जिल्हा प्रशासन, पोलीस, महापालिका, नगरपालिका आदी विविध स्थानिक स्वराज्य संस्था यांनी सतर्क रहावं आणि नागरिकांना सर्वतोपरी मदत करावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. सर्व यंत्रणांनी हवामान खात्याकडून तसंच आपत्ती व्यवस्थापन कक्षाकडून परिस्थितीची वेळोवेळी माहिती घ्यावी आणि त्यानुसार नियोजन करावं पूरग्रस्त क्षेत्रात अन्नधान्य, औषधं आणि आवश्यक साहित्य तसंच पर्यायी निवारास्थानं उपलब्ध करून ठेवावीत. जनावरांच्या स्थलांतराचीही व्यवस्था तयार ठेवावी, अशा विविध सूचना मुख्यमंत्री शिंदे यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

**या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**